Publication : Maharashtra Times
Dated : 10.07.2020
Page: 1 & 3

## 'अदानी'कडून व्याजमुक्त हप्ता

मुंबई : अदानी एनर्जी मुंबई लिमिटेडने अखेर ग्राहकांना व्याजमुक्त हप्ता भरण्याची सुविधा देण्याची घोषणा केली आहे. भरमसाठ वीजबिल तीन मासिक हप्त्यात भरताना थकित रक्कमेवर व्याज वसूली केली जात आहे, असे वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स' ने गुरुवारी दिले. त्यानंतर एईएमएलने ही घोषणा केली.

➤ वृत्त..३

## 'अदानी'च्या बिलहप्त्यावर व्याजआकारणी नाही

- ३० लाख ग्राहकांना मिळणार फायदा
- 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वृत्तानंतर खडबडून जाग

म.टा. प्रतिनिधी, मुंबई

अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) अखेर ग्राहकांना व्याजमुक्त हप्ता भरण्याची सुविधा देण्याची घोषणा केली आहे. ग्राहकांना भरमसाठ वीजबिल तीन मासिक हफ्त्यात भरणा करण्याची मुभा असली तरी थकित रक्कमेवर व्याज वसुली केली जात आहे, असे वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स' ने गुरुवारी प्रकाशित केले. त्यानंतर एईएमएलला खडबडून जाग आली व त्यांनी ही घोषणा केली. त्याचा मुंबईतील ३० लाख ग्राहकांना फायदा मिळणार आहे.




मटा इम्पॅक्ट

लॉकडाउन काळात सरासरी वीजबिल आल्यानंतर जून महिन्यात रीडिंग घेतल्यावर ग्राहकांना भरमसाठ रक्कमेची देयके आली. त्यावरुन राज्यभर निर्माण झालेल्या असंतोषाची झाल्यानंतर महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) स्वतःहून दखल घेत ग्राहकांना तीन महिन्यांत बील भरणा करण्यासाठी हफ्त्याची मुभा द्यावी, असे निर्देश दिले. ग्राहकांनी जून महिन्याचा असा पहिला हफ्ता मुदतीच्या आधी भरल्यास त्यावर कुठलेही व्याज न आकारण्याचा निर्णय घेतला. परंतु मुंबईतील ७० टक्के ग्राहकांना वीजपुरवठा करणारी एईएमल मात्र अशा थकित रकमेवर ९ टक्के व्याज आकारत होती. यासंदर्भात 'मटा' ने गुरुवारी वृत्त प्रकाशित केले. त्यानंतर एईएमएलच्या अधिकाऱ्यांनी तातडीची बैठक घेतली व त्यामध्ये ग्राहकांना व्याजमाफी देण्याचा निर्णय घेतला.

एईएमएलचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ कंदर्प पटेल यांनी सांगितले की, 'एमईआरसीच्या निर्देशांनुसार करोनासारख्या संकटकाळात ग्राहकांना सर्वाधिक दिलासा देण्यासाठी एईएमएलने हा निर्णय गुरुवारी घेतला. याअंतर्गत मुदतीपूर्वी बील भरणा करणाऱ्या ग्राहकांना थकित रक्कमेवर ही व्याजमाफी मिळेल.'

एईएमएलचे देयकचक्र दर महिन्याच्या १६ तारखेपासून ते पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत असते. त्यानुसार लॉकडाऊननंतर जून महिन्यातील रीडिंगची देयके ग्राहकांना १० जुलैपर्यंत पाठवली जात आहेत. ग्राहकांना पुढील २१ दिवसांपूर्वी त्याचा भरणा करावा लागतो.

### 'बेस्ट'चा निर्णय कधी?

मुंबईत सर्वाधिक ग्राहकसंख्या असलेल्या एईएमएलने हा निर्णय घेतला आहे. तर ईशान्य मुंबई व ठाणे जिल्ह्यात महावितरणाचे ग्राहक असल्याने त्यांनादेखील व्याजमुक्त हफ्ता मिळणार आहे. पण आता प्रामुख्याने दक्षिण मुंबईत १० लाख ग्राहकसंख्या असलेली बेस्ट उपक्रम कंपनी हा निर्णय कधी घेणार? असा प्रश्न उपस्थित होत